क्र. मजनिप्रा/प्रशा/ पेस्ट कंट्रोल /२०२५/४१४ दि.०७/०८/२०२५.

**विषय:- महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई या कार्यालयात पेस्ट कंट्रोल दरपत्रके मागविणेबाबत...**

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, कुलाबा, मुंबई या कार्यालयात पेस्ट कंट्रोल करण्यासाठी पात्र संस्थेकडून संस्थेच्या लेटर हेडवर विहित नमुन्यात (परिशिष्ट -१) सीलबंद दरपत्रके मागविण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | पेस्ट कंट्रोल तपशील | Jel & Spray (Odourless) (Mention Brand name) | Monthly |
| | | Anti-Termite Treatment By drill and fill method & quarterly Checkup treatment with three year Guarantee. | |
| २ | जागेचा तपशील | MWRRA Office Carpet area is 8172.75 Sq.ft | |
| ३ | तांत्रिक व आर्थिक दरपत्रके सादर करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि. १८/०८/२०२५ वेळ:- दुपारी ४ :०० पर्यंत | |
| ४ | दरपत्रके उघडण्याची दिनांक व वेळ | दि. २०/०८/२०२५ वेळ:- ०४:०० वा. कार्यालयाच्या पत्त्यावर | |

२. दरपत्रक पाठवितांना तांत्रिक व आर्थिक दरपत्रक वेगवेगळया लिफाफ्यामध्ये पाठविण्यात यावे.

१) **लिफाफा क्र- १ :**

तांत्रिक दरपत्रक यामध्ये खालील कागदपत्रे सादर करण्यात यावीत.

I. मुंबई दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ नुसार दुकानाची मुंबई येथील नोंदणीच्या प्रमाणपत्राची प्रत.

II. किटकनाशक कायदा, १९६८ अंतर्गत कीटक नियंत्रण ऑपरेटरकडे व्यावसायिक किटक नियंत्रण परवाना असणे आवश्यक आहे.

III. GST Number
IV. पॅन कार्ड
V. मागील ३ आर्थिक वर्षाची उलाढाल (मागील ३ वर्षाची आयकर प्रमाणपत्र)
VI. पेस्ट कंट्रोल केल्याचा मागील किमान ३ वर्षाचा अनुभव
VII. खरेदी प्राधिकाऱ्यांबरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छूक संस्थेने एकल दरपत्रक सादर केल्याबाबतचे हमीपत्र (संस्थेच्या लेटरहेडवर)

२) **लिफाफा क्र- २ :**

संस्थेच्या लेटर हेडवर विहित नमुन्यात (परिशिष्ट -१ नुसार) पेस्ट कंट्रोलचा दर नमूद करण्यात यावा.

३. प्रस्तूत पेस्ट कंट्रोल कराराचा कालावधी एक वर्षाचा राहील. संस्थेच्या कामाची गुणवत्ता पाहून, आवश्यकता वाटल्यास, प्राधिकरण व संस्था दोघांच्या मान्यतेने कराराचा कालावधी अतिरिक्त ६ महिने वाढविता येईल. याबाबतचा अंतिम निर्णय प्राधिकरण कार्यालयाचा राहील.

४. पेस्ट कंट्रोल दर हा सर्व करांसहित नमूद असावा. सदरचा दर कराराच्या कालावधीपर्यंत अस्तित्वात राहील. त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होणार नाही. प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

५. अंतिम दिनांक व वेळेनंतरच्या तांत्रिक व आर्थिक दरपत्रके स्वीकारली जाणार नाहीत.

६. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, कुलाबा, मुंबई यांना कोणत्याही कारणाशिवाय दरपत्रके स्वीकारण्याचे व नाकारण्याचे अधिकार राहतील.

७. ज्या संस्थांना महाराष्ट्र शासनाने गैरव्यवहार या कारणांसाठी अपात्र ठरविले आहे, अशा संस्थांना दरपत्रके भरता येणार नाहीत.

८. दरपत्रके भरणाऱ्या संस्थांना आपल्या संस्थेचे नाव, पत्ता आणि दुरध्वनी क्रमांक देणे आवश्यक राहील.

९. ज्या संस्थेने दरपत्रक स्वीकारले जाईल, त्या संस्थेस काम देण्यापूर्वी त्या संस्थेने करारपत्र करणे आवश्यक राहील.

१०. जर संस्थेच्या सेवा समाधानकारक न वाटल्यास सदर करार तात्काळ रद्द करण्यात येईल. हा करार एक वर्ष कालावधीसाठी वैध राहील.

ठिकाण: मुंबई

(मल्लिकार्जून धरणे)
सचिव,
महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई

# परिशिष्ट -१

दरपत्रक सादर करण्याकरिता प्रपत्र (दरपत्रक धारकाच्या लेटरहेडवर)

प्रति, दिनांक: /०८/२०२५

मा. सचिव,
महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण,
९वा मजला, वर्ल्ड ट्रेड सेंटर, सेंटर -१,
कफ परेड, कुलाबा,
मुंबई -४०० ००५.

**कामाचे नाव:- पेस्ट कंट्रोल करण्याबाबत...**
संदर्भ:- मजनिप्रा/प्रशा/ पेस्ट कंट्रोल /२०२५/४१४, दि. ०७/ ०८/२०२५.

**महोदय,**

मी/ आम्ही उपरोक्त नमुद केलेले काम, दरपत्रक सूचनामधील अटी व शर्ती यांच्या अधीन राहून तसेच दरपत्रक सूचनांमध्ये नमुद विनिर्दीष्ट कामाकरिता अदा करावयाच्या देय रकमेचा विचार करून खाली दर्शविलेल्या दरानुसार खरेदी कार्यान्वित करण्यासाठी प्रस्तावित करीत आहोत:-

| Sr. No. | Treatment Method | Services Period | Charges | Tax if any | Total Amt in Rs. |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Jel & Spray (Odourless)<br>(Mention Brand name)<br>Office Carpet area is 8172.75 Sq.ft | Monthly | | | |
| 2 | Anti-Termite Treatment<br>By drill and fill method & quarterly Checkup treatment with three year Guarantee. | | | | |
| | | | | **Total** | |

आम्ही दरपत्रक सूचनेतील अटी व शर्ती तसेच महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचे नियम व कायदे वाचले असुन ते आमच्यावर बंधनकारक आहेत.

आपला विश्वासू,

दरपत्रक धारकाची सही

दिनांक:- /०८/२०२५.

नावः-

पत्ता:-

साक्षीदार:-